अध्याय तिसरा

अर्जुन उवाच: ज्यायसी चेत् कर्मणस्ते मता बुद्धिर्जनार्दन ।

तत् किं कर्मणि घोरे मां नियोजयसि केशव || १ ||

मग आइका अर्जुनें म्हणितलें । देवा तुम्हीं जें वाक्य बोलिले ।

तें निकें म्यां परिसलें । कमळापती || १ ||

तेथ कर्म आणि कर्ता । उरेचिना पाहतां ।

ऐसें मत तुझें अनंता । निश्चित जरी || २ ||

तरी मातें केवी हरी । म्हणसी पार्था संग्रामु करीं ।

इये लाजसीना महाघोरीं । कर्मी सुता || ३ ||

हां गा कर्म तूंचि अशेष । निराकारासी निःशेष ।

तरी मजकरवीं हें हिंसक । कां करविसी तूं || ४ ||

तरीं हेंचि विचारीं हृषीकेशा । तूं मानु देसी कर्मलेशा ।

आणि येसणी हे हिंसा । करवित अहासी || ५ ||

व्यामिश्रेणेव वाक्येन बुद्धिं मोहयसीव मे ।

तदेकं वद निश्चित्य येन श्रेयोऽहमाप्नुयाम् || २ ||

देवा तुवांचि ऐसें बोलावें । तरी आम्हीं नेणतीं काय करावें ।

आता संपले म्हणे पां आघवें । विवेकाचें || ६ ||

हां गा उपदेशु जरी ऐसा । तरी अपभ्रंशु तो कैसा ।

आतां पुरला आम्हां धिंवसा । आत्मबोधाचा || ७ ||

वैद्यु पथ्य वारूनि जाये । मग जरी आपणचि विष सुये ।

तरी रोगिया कैसेनि जिये । सांगे मज || ८ ||

जैसे आंधळे सुईजे आव्हांटा । कां माजवण दीजे मर्कटा ।

तैसा उपदेशु हा गोमटा । वोढवला आम्हां ॥ ९ ॥

मी आधींचि कांही नेणें । वरी कवळिलों मोहें येणें ।

कृष्णा विवेकु या कारणें । पुसिला तुज ॥ १० ॥

तंव तुझी एकेकी नवाई । एथ उपदेशामाजीं गांवाई ।

तरी अनुसरलिया काई । ऐसें कीजे ॥ ११ ॥

आम्हीं तनुमनुजीवें । तुझिया बोला वोटंगावें ।

आणि तुवांचि ऐसें करावें । तरी सरलें म्हणे ॥ १२ ॥

आतां ऐसियापरी बोधिसी । तरी निकें आम्हां करिसी ।

एथ ज्ञानाची आस कायसी । अर्जुन म्हणे ॥ १३ ॥

तरी ये जाणिवेचे कीर सरलें । परी आणिक एक असें जाहलें ।

जें थितें हें डहुळलें । मानस माझें ॥ १४ ॥

तेवींचि कृष्णा हें तुझें । चरित्र कांहीं नेणिजे ।

जरी चित्त पाहसी माझें । येणे मिषें ॥ १५ ॥

ना तरी झकवितु आहासी मातें । की तत्वचि कथिलें ध्वनितें ।

हे अवगमतां निरुतें । जाणवेना ॥ १६ ॥

म्हणोनि आइकें देवा । हा भावार्थु आतां न बोलावा ।

मज विवेकु सांगावा । मऱ्हाटा जी ॥ १७ ॥

मी अत्यंत जड असें । परी ऐसाही निकें परियसें ।

कृष्णा बोलावें तुवां तैसें । एकनिष्ठ ॥ १८ ॥

देखें रोगातें जिणावें । औषध तरी द्यावें ।

परी तें अतिरुच्य व्हावें । मधुर जैसें ॥ १९ ॥

तैसें सकळार्थभरित । तत्व सांगावे उचित ।

परी बोधे माझें चित्त । जयापरी ॥ २० ॥

देवा तुज ऐसा निजगुरु । आणि आर्तीधणी कां न करूं ।

एथ भीड कवणाची धरूं । तूं माय आमुची ॥ २१॥

हां गा कामधेनूचें दुभतें । देवें जाहलें जरी आपैतें ।

तरी कामनेची कां तेथें । वानी कीजे ॥ २२ ॥

जरी चिंतामणि हातां चढे । तरी वांछेचे कवण सांकडे ।

कां आपुलेनि सुरवाडें । इच्छावें ना ॥ २३ ॥

देखें अमृतसिंधूतें ठाकावें । मग तहाना जरी फुटावें ।

मग सायासु कां करावे । मागील ते ॥ २४ ॥

तैसा जन्मांतरी बहुतीं । उपासिता लक्ष्मीपती ।

तूं दैवें आजि हातीं । जाहलासी जरी ॥ २५ ॥

तरी आपुलेया सवेसा । कां न मगावासी परेशा ।

देवा सुकाळु हा मानसा । पाहला असे ॥ २६ ॥

देखें सकळार्तीचें जियालें । आजि पुण्य यशासि आलें ।

हे मनोरथ जहाले । विजयी माझे ॥ २७ ॥

जी जी परममंगळधामा । देवदेवोत्तमा ।

तूं स्वाधीन आजि आम्हां । म्हणऊनियां ॥ २८ ॥

जैसां मातेचां ठायीं । अपत्या अनवसरु नाहीं ।

स्तन्यालागूनि पाहीं । जियापरी ॥ २९ ॥

तैसें देवा तूंते। पुसिजतसें आवडे तें ।

आपुलेनि आर्ते । कृपानिधि ॥ ३० ॥

तरी पारत्रिकीं हित । आणि आचरितां तरी उचित ।

ते सांगें एक निश्चित । पार्थु म्हणे ॥ ३१ ॥

श्रीभगवानुवाच: लोकेऽस्मिन् द्विविधा निष्ठा पुरा प्रोक्ता मयाऽनघ ।

ज्ञानयोगेन सांख्यानां कर्मयोगेन योगिनां ॥ ३ ॥

या बोला अच्युतु । म्हणतसे विस्मितु ।

अर्जुना हा ध्वनितु । अभिप्रावो ॥ ३२ ॥

जे बुद्धियोगु सांगतां । सांख्यमतसंस्था ।

प्रकटिली स्वभावता । प्रसंगे आम्हीं ॥ ३३ ॥

तो उद्देशु तूं नेणसी । म्हणोनि क्षोभलासि वायांचि ।

तरी आता जाण म्यांचि । उक्त दोन्ही ॥ ३४ ॥

अवधारीं वीरश्रेष्ठा । यें लोकीं या दोन्ही निष्ठा ।

मजचिपासूनि प्रगटा । अनादिसिद्धा ॥ ३५ ॥

एकु ज्ञानयोगु म्हणिजे । जो सांख्यीं अनुष्ठीजे ।

जेथ ओळखीसवें पाविजे । तद्रूपता ॥ ३६ ॥

एक कर्मयोगु जाण । जेथ साधकजन निपुण ।

होवूनिया निर्वाण । पावती वेळे ॥ ३७ ॥

हे मार्गु तरी दोनी । परि एकवटती निदानीं ।

जैसे सिद्धसाध्यभोजनीं । तृप्ति एकी ॥ ३८ ॥

कां पूर्वापर सरिता । भिन्ना दिसती पाहतां ।

मग सिंधूमिळणीं ऐक्यता । पावती शेखीं ॥ ३९ ॥

तैसीं दोनी ये मतें । सूचिती एका कारणातें ।

परी उपास्ति ते योग्यते - । आधीन असे ॥ ४० ॥

देखें उत्प्लवनासरिसा । पक्षी फळासि झोंबे जैसा ।

सांगें नरु केवीं तैसा । पावे वेगां ॥ ४१ ॥

तो हळूहळू ढाळेंढाळें । केतुकेनि एके वेळे ।

मार्गाचेनि बळें । निश्चित ठाकी ॥ ४२ ॥

तैसें देख पां विहंगममतें । अधिष्ठूनि ज्ञानातें ।

सांख्य सद्य मोक्षातें । आकळिती ॥ ४३ ॥

येर योगिये कर्माधारें । विहितेंचि निजाचारें ।

पूर्णता अवसरें । पावतें होती ॥ ४४ ॥

न कर्मणामनारभान् नैष्कर्म्यं पुरुषोऽश्नुते ।

न च संन्यसनादेव सिद्धिं समाधिगच्छति ॥ ४ ॥

वांचोनि कर्मारंभ उचित । न करितांचि सिद्धवत ।

कर्महीना निश्चित । होईजेना ॥ ४५ ॥

कां प्राप्तकर्म सांडिजे । येतुलेनि नैष्कर्म्या होईजे ।

हें अर्जुना वायां बोलिजे । मूर्खपणें ॥ ४६ ॥

सांगें पैलतीरा जावें । ऐसें व्यसन कां जेथ पावे ।

तेथ नावेतें त्यजावें । घडे केवीं ॥ ४७ ॥

ना तरी तृप्तिइच्छिजे । तरी कैसेनि पाकु न कीजे ।

कीं सिद्धुही न सेविजे । केवीं सांगें ॥ ४८ ॥

जंव निरार्तता नाहीं । तंव व्यापारु असे पाहीं ।

मग संतुष्टीचां ठायीं । कुंठे सहजें ॥ ४९ ॥

म्हणोनि आइकें पार्था । जया नैष्कर्म्यपदीं आस्था ।

तया उचित कर्म सर्वथा । त्याज्य नोहे ॥ ५० ॥

आणि आपुलालिया चाडे । आपादिले हे मांडे ।

कीं त्यजिलें हें कर्म सांडे । ऐसें आहे ॥ ७१ ॥

हें वायाचि सैरा बोलिजे । उकलु तरी देखों पाहिजे ।

परी त्यजितां कर्म न त्यजे । निभ्रांत मानी ॥ ७२ ॥

न हि कश्चित् क्षणमपि जातु तिष्ठत्यकर्मकृत् ।

कार्यते ह्यवशः कर्म सर्वः प्रकृतिजैर्गुणैः॥ ५ ॥

जंव प्रकृतीचें अधिष्ठान । तंव सांडी मांडी हें अज्ञान ।

जि चेष्टा गुणाधीन । आपैसी असे ॥ ७३ ॥

देखें विहित कर्म जेतुलें । तें सळें जरी वोसंडिलें ।

तरी स्वभाव काय निमाले । इंद्रियांचे ॥ ७४ ॥

सांगे श्रवणीं ऐकावें ठेलें । की नेत्रीचे तेज गेलें ।

हें नासारंध्र बुझालें । परिमळु नेघे ॥ ७५ ॥

ना तरी प्राणापानगति । की निर्विकल्प जाहली मति ।

की क्षुधातृषादिआर्ति । खुंटलिया ॥ ७६ ॥

हे स्वप्नावबोधु ठेले । कीं चरण चालो विसरले ।

हे असो काय निमाले । जन्ममृत्यू॥ ७७ ॥

हें न ठकेचि जरी कांही । तरी सांडिले तें कायी ।

म्हणोनि कर्मत्यागु नाही । प्रकृतिमंतां ॥ ७८ ॥

कर्म पराधीनपणे । निपजतसे प्रकृतिगुणें ।

येरीं धरीं मोकलीं अंतःकरणें । वाहिजे वायां ॥ ७९ ॥

देखें रथीं आरूढिजे । मग निश्चळा बैसिजे ।

मग चळा होऊनि हिंडिजे । परतंत्रा ॥ ६० ॥

कां उचलिलें वायुवशें । चळें शुष्क पत्र जैसें ।

निचेष्ट आकाशे। परिभ्रमे ॥ ६१ ॥

तैसें प्रकृतिआधारें। कर्मेंद्रियविकारें।

मिष्कर्म्यु ही व्यापारे। निरंतर ॥ ६२ ॥

म्हणऊनि संगु जंव प्रकृतिचा। तंव त्यागु न घडे कर्माचा।

ऐसियाहि करूं म्हणती तयांचा। आग्रहोचि उरें ॥ ६३ ॥

कर्मेंद्रियाणि संयम्य य आस्ते मनसा स्मरन्।

इंद्रियार्थान् विमूढात्मा मिथ्याचारः स उचयते ॥ ६ ॥

जे उचित कर्म सांडिती। मग नैष्कर्म्य होऊं पाहती।

परी कर्मेंद्रियप्रवृत्ती। निरोधूनि॥ ६४ ॥

तयां कर्मत्यागु न घडे। जें कर्तव्य मनीं सापडे।

वरी नटती तें फुडे। दरिद्र जाण॥ ६५ ॥

ऐसे ते पार्था। विषयासक्त सर्वथा।

वोळखावे तत्वता। येथ भ्रांति नाहीं ॥ ६६ ॥

आतां देई अवधान। प्रसंगे तुज सांगेन।

या नैराश्याचे चिन्ह। धनुर्धरा॥ ६७ ॥

यस्तित्वंद्रियाणि मनसा नियम्यारभतेऽर्जुन।

कर्मेन्द्रियैः कर्मयोगमसक्तः न विशिष्यते ॥ ७ ॥

जो अंतरी दृढु। परमात्मरूपीं गूढु।

बाह्य तरी रूढु। लौकिक जैसा॥ ६८ ॥

तो इंद्रियां आज्ञा न करी। विषयांचे भय न धरी।

प्राप्त कर्म न अव्हेरी। उचित जें जें॥ ६९ ॥

तो कर्मेंद्रियें कर्मी। राहाटतां तरी न नियमी।

परी तेथिचेनि उर्मी । झांकोळेना ॥ ७० ॥

तो कामनामात्रें न घेपे । मोहमळें न लिंपे ।

जैसे जळीं जळें न शिंपें । पद्मपत्र ॥ ७१ ॥

तैसा संसर्गामाजि असे । सकळांसारिखा दिसे ।

जैसें तोयसंगे आभासे । भानुबिंब ॥ ७२ ॥

तैसा सामन्यत्वें पाहिजे । तरी साधारणुचि देखिजे ।

येरवीं निर्धारितां नेणिजे । सोय जयाची ॥ ७३ ॥

ऐसां चिन्हीं चिन्हितु । देखसी तोचि तरी मुक्तु ।

आशापाशरहितु । वोळख पां ॥ ७४ ॥

अर्जुना तोचि योगी । विशेषिजे जो जगीं ।

म्हणोनि ऐसा होय यालागीं । म्हणिपे तूंते॥ ७५ ॥

तूं मानसा नियमु करीं । निश्चळु होय अंतरी ।

मग कर्मेंद्रियें हीं व्यापारीं । वर्ततु सुखें ॥ ७६ ॥

नियतं कुरु कर्म त्वं ज्यायो ह्यकर्मणः ।

शरीरयात्रापि च ते न प्रसिध्येदकर्मणः ॥ ८ ॥

म्हणशी नैष्कर्म्य होआवें । तरी एथ तें न संभवे ।

आणि निषिद्ध केवीं राहाटावें । विचारी पां ॥ ७७ ॥

म्हणोनि जें जें उचित । आणि अवसरेंकरून प्राप्त ।

तें कर्म हेतुरहित । आचर तूं॥ ७८ ॥

पार्था आणिकही एक । नेणसी तूं हे कवतिक ।

जें ऐसें कर्म मोचक । आपैसें असे ॥ ७९ ॥

देखें अनुक्रमाधारें । स्वधर्मु जो आचरे ।

तो मोक्षु तेणें व्यापारें । निश्चित पावे ॥ ८० ॥

यज्ञार्थात् कर्मणोऽन्यत्र लोकोऽयं कर्मबंधनः ।

तदर्थे कर्म कौंतेय मुक्तसङ्गः समाचरः ॥ ९ ॥

स्वधर्मु जो बापा । तोचि नित्ययज्ञु जाण पां ।

म्हणोनि वर्ततां तेथ पापा । संचारु नाहीं ॥ ८१ ॥

हा निजधर्मु जैं सांडे । कुकर्मी रति घडे ।

तैंचि बंधु पडे । संसारिकु ॥ ८२ ॥

म्हणोनि स्वधर्मानुष्ठान । ते अखंड यज्ञयाजन ।

जो करी तया बंधन । कहींच नाहीं ॥ ८३ ॥

हा लोकु कर्मे बांधिला । जो परतंत्रा भुतला ।

तो नित्ययज्ञाते चुकला । म्हणोनियां ॥ ८४ ॥

आतां येचिविशीं पार्था । तुज सांगेन एकी मी कथा ।

जैं सृष्ट्यादिसंस्था । ब्रह्मेनि केली ॥ ८५ ॥

सहयज्ञाः प्रजाः सृष्ट्वा पुरोवाच प्रजापतिः ।

अनेन प्रसविष्यध्वमेष वोऽस्त्विष्टकामधुक् ॥ १० ॥

तें नित्ययागसहितें । सृजिलीं भूतें समस्तें ।

परी नेणतीचि तिये यज्ञातें । सूक्ष्म म्हणऊनी ॥ ८६ ॥

तें वेळीं प्रजीं विनविला ब्रह्मा । देवा आश्रयो काय एथ आम्हां ।

तंव म्हणे तो कमळजन्मा । भूतांप्रति ॥ ८७ ॥

तुम्हां वर्णविशेषवशें । आम्हीं हा स्वधर्मुचि विहिला असे ।

यातें उपासा मग आपैसे । काम पुरती ॥ ८८ ॥

तुम्हीं व्रतें नियमु न करावे । शरीरातें न पीडावें ।

दुरी केंही न वचावे । तीर्थासी गा ॥ ८९ ॥

योगादिक साधनें । साकांक्ष आराधनें ।

मंत्रयंत्रविधानें । झणीं करा ॥ ९० ॥

देवतांतरा न भजावें । हें सर्वथा कांहीं न करावे ।

तुम्हीं स्वधर्मयज्ञीं यजावें । अनायासें ॥ ९१ ॥

अहेतुकें चित्तें । अनुष्ठां पां ययातें ।

पतिव्रता पतीतें । जियापरी ॥ ९२ ॥

तैसा स्वधर्मरूप मखु । हाचि सेव्य तुम्हां एकु ।

ऐसें सत्यलोकनायकु । म्हणता जहाला ॥ ९३ ॥

देखा स्वधर्मातें भजाल । तरी कामधेनु हा होईल ।

मग प्रजाहो न संडील । तुमतें सदा ॥ ९४ ॥

देवान् भावयतानेन ते देवाः भावयंतु वः ।

परस्परं भावयंतः श्रेयः परमवाप्स्यच ॥ ११ ॥

जें येणेंचिकरूनि समस्तां । परितोषु होईल देवतां ।

मग ते तुम्हां ईप्सीता । अर्थांते देती ॥ ९५ ॥

या स्वधर्मपूजा पूजितां । देवतागणां समस्तां ।

योगक्षेमु निश्चिता । करिती तुमचा ॥ ९६ ॥

तुम्हीं देवतांते भजाल । देव तुम्हां तुष्टितील ।

ऐसी परस्परें घडेल । प्रीति तेथ ॥ ९७ ॥

तेथ तुम्हीं जें करूं म्हणाल । ते आपैसे सिद्धी जाईल ।

वांछितही पुरेल । मानसींचे ॥ ९८॥

वाचासिद्धी पावाल । आज्ञापक होआल ।

म्हणिये तुमतें मागतील । महाऋद्धि ॥ ९९ ॥

जैसें ऋतुपतींचे द्वार । वनश्री निरंतर ।

वोळगे फळभार । लावण्येंसी ॥ १००॥

इष्टान् भोगान् हि वो देवा दास्यंते यज्ञभाविताः ।

तैर्दत्तानप्रदायैभ्योयो भुङ्क्ते स्तेन एव सः ॥ १२ ॥

तैसें सर्व सुखेंसहित । दैवचि मूर्तिमंत ।

येईल देखा काढत । तुम्हापांठी ॥ १०१ ॥

ऐसे समस्त भोगभरित । होआल तुम्ही अनार्त ।

जरी स्वधर्मैकनिरत । वर्ताल बापा ॥ १०२ ॥

कां जालिया सकल संपदा । जो अनुसरेल इंद्रियमदा ।

लुब्ध होऊनियां स्वादां । विषयांचिया ॥ १०३ ॥

तिहीं यज्ञभाविकीं सुरीं । जे हे संपत्ति दिधली पुरी ।

तयां स्वमार्गीं सर्वेश्वरीं । न भजेल तो ॥ १०४ ॥

अग्निमुखीं हवन । न करील देवतापूजन ।

प्राप्त वेळे भोजन । ब्राह्मणांचे ॥ १०५ ॥

विमुखु होईल गुरुभक्ती । आदरु न करील अतिथी ।

संतोषु नेदील ज्ञाती । आपुलिये ॥ १०६ ॥

ऐसा स्वधर्मक्रियारहितु । आथिलेपणे प्रमत्तु ।

केवळ भोगासक्तु । होईल जो ॥ १०७ ॥

तया मग अपावो थोरु आहे । जेणें तें हातीचे सकळ जाये ।

देखा प्राप्तही न लाहे । भोग भोगूं ॥ १०८ ॥

जैसें गतायुषीं शरीरीं । चैतन्य वासु न करी ।

कां निदैवाचां घरीं । न राहे लक्ष्मी ॥ १०९ ॥

तैसा स्वधर्मु जरी लोपला । तरी सर्व सुखांचा थारा मोडला।

जैसा दीपासवे हरपला । प्रकाशु जाय ॥ ११० ॥

तैसी निजवृत्तिजेथ सांडे । तेथ स्वतंत्रते वस्ती न घडे ।

आइका प्रजाहो हे फुडें । विरंचि म्हणे ॥ १११ ॥

म्हणऊनि स्वधर्मु जो सांडील । तयातें काळु दंडील ।

चोरु म्हणूनि हरील । सर्वस्व तयांचे ॥ ११२ ॥

मग सकळ दोष भंवते । गिंवसोनि घेती तयातें ।

रात्रिसमयीं स्मशानातें । भूतें जैशी ॥ ११३ ॥

तैशी त्रिभुवनींची दुःखे । आणि नानाविध पातकें ।

दैन्यजात तितुकें । तेथेंचि वसे ॥ ११४ ॥

ऐसें होय तया उन्मत्ता । मग न सुटे बापां रुदतां ।

परी कल्पांतीहीं सर्वथा । प्राणिगण हो ॥ ११५ ॥

म्हणोनि निजवृत्तिहे न संडावी । इंद्रिये बरळों नेदावीं ।

ऐसें प्रजांते शिकवी । चतुराननु ॥ ११६ ॥

जैसें जळचरां जळ सांडे । आणि तत्क्षणीं मरण मांडे ।

हा स्वधर्मु तेणें पाडें । विसंबों नये ॥ ११७ ॥

म्हणोनि तुम्ही समस्तीं । आपुलालिया कर्मी उचितीं ।

निरत व्हावें पुढतपुढती । म्हणिपत असे ॥ ११८ ॥

यज्ञशिष्टाशिनः सन्तो मुच्यते सर्वकिल्बिषैः ।

भुङ्जते ते त्वघं पापा ये पचंत्यात्मकारणात् ॥ १३ ॥

देखा विहित क्रियविधी । निर्हेतुका बुद्धी ।

जो असतिये समृद्धी। विनियोगु करी ॥ ११९ ॥

गुरु गोत्र अग्नि पूजी। अवसरीं भजे द्विजीं।

निमितादिकीं यजी। पितरोद्देश ॥ १२० ॥

या यज्ञक्रिया उचिता। यज्ञेशीं हवन करितां।

हुतशेष स्वभावतः। उरे जें जें ॥ १२१ ॥

तें सुखे आपुलां घरीं। कुटुंबेसीं भोजन करी।

कीं भोग्यचि तें निवारी। कल्मषातें ॥ १२२ ॥

तें यज्ञावशिष्ट भोगी। म्हणोनि सांडिजे तो अधीं।

जयापरी महारोगीं। अमृतसिद्धी॥ १२३ ॥

कां तत्वनिष्ठु जैसा। नागवे भ्रांतिलेशा।

तो शेषभोगी तैसा। नाकळे दोषा ॥ १२४ ॥

म्हणोनि स्वधर्में जें अर्जे। तें स्वधर्मेंचि विनियोगिजे।

मग उरे तें भोगिजे। संतोषेंसीं ॥ १२५ ॥

हें वांचूनि पार्था। राहाटों नये अन्यथा।

ऐसी आद्य ही कथा। मुरारी सांगे ॥ १२६ ॥

जें देहचि आपणपें मानिति। आणि विषयांते भोग्य म्हणती।

यापरतें न स्मरती। आणिक कांही ॥ १२७ ॥

हे यज्ञोपकरण सकळ। नेणसांते बरळ।

अहंबुद्धी केवळ। भोगूं पाहती ॥ १२८ ॥

इंद्रियरुचीसारखे। करविती पाक निके।

ते पापिये पातकें। सेविती जाण ॥ १२९ ॥

जे संपत्तिजात आघवें। हे हवनद्रव्य मानावें।

मग स्वधर्मयज्ञें अर्पावें। आदिपुरुषी॥ १३० ॥

हें सांडोनिया मूर्ख। आपणपेयांलागीं देख।

निपजविती पाक। नानाविध॥ १३१ ॥

जिहीं यज्ञु सिद्धी जाये। परेशा तोषु होये।

तें हें सामान्य अन्न न होये। म्हणोनियां॥ १३२ ॥

हें न म्हणावें साधारण। अन्न ब्रह्मरूप जाण।

जे जीवनहेतु कारण। विश्वा यया॥ १३३ ॥

अन्नाद् भवन्ति भूतानि पर्जन्यादन्नस्संभवः।

यज्ञाद् भवति पर्जन्यो यज्ञः कर्मसमुद्भवः॥ १४ ॥

अन्नास्तव भूतें। प्ररोह पावति समस्तें।

मग वरिषु या अन्नाते। सर्वत्र प्रसवे॥ १३४ ॥

त्या पर्जन्या यज्ञीं जन्म। यज्ञाते प्रगटी कर्म।

कर्मासि आदि ब्रह्म। वेदरूप॥ १३५ ॥

कर्म ब्रह्मोद्भवं विद्धि ब्रह्माक्षरसमुद्भवं।

तस्मात् सर्वगतं ब्रह्म नित्यं यज्ञे प्रतिष्ठितं॥ १५ ॥

मग वेदांते परापर। प्रसवतसे अक्षर।

म्हणऊनि हे चराचर। ब्रह्मबद्ध॥ १३६ ॥

परी कर्माचिये मूर्ति। यज्ञीं अधिवासु श्रुती।

ऐकें सुभद्रापती। अखंड गा॥ १३७ ॥

एवं प्रवर्तितं चक्रं नानुवर्तयतीह यः।

अघायुरिंद्रियारामो मोघं पार्थ स जीवती॥ १६ ॥

ऐशीं आदि हे परंपरा। संक्षेपे तुज धनुर्धरा।

सांगितली या अध्वरा । लागौनियां ॥ १३८ ॥

म्हणूनि समूळ हा उचितु । स्वधर्मरूप क्रतु ।

नानुष्ठी जो मत्तु । लोकीं इये ॥ १३९ ॥

तो पातकांची राशी । जाण भार भूमीसी ॥

जो कुकर्मे इंद्रियांसी । उपेगा गेला ॥ १४० ॥

तें जन्म कर्म सकळ । अर्जुना अति निष्फळ ।

जैसे कां अभ्रपटळ । अकाळींचे ॥ १४१ ॥

कां गळा स्तन अजेचे । तैसें जियालें देखें तयाचें ।

जया अनुष्ठान स्वधर्माचें । घडेचिना ॥ १४२ ॥

म्हणोनि ऐकें पांडवा । हा स्वधर्मु कवणे न संडावा ।

सर्वभावें भजावा । हाचि एकु ॥ १४३ ॥

हां गा शरीर जरी जाहलें । तरी कर्तव्य वोघें आले ।

मग उचित कां आपुले । वोसंडावे ॥ १४४ ॥

परिस पां सव्यसाची । मूर्ती लाहोनि देहाचि ।

खंती करिती कर्माची । ते गावंढे गा ॥ १४५ ॥

यस्त्वात्मरतिरेव स्यादात्मतृप्तश्च मानवः ।

आत्मन्येव च संतुष्टस्तस्य कार्यं न विद्यते ॥ १७ ॥

देखें असतेनि देहकर्में । एथ तोचि एकु न लिंपे कर्में ।

जो अखंडित रमे । आपणपांचि ॥ १४६ ॥

जे तो आत्मबोधें तोषला । तरी कृतकार्यु देखें जाहला ।

म्हणोनि सहजे सांडवला । कर्मसंगु ॥ १४७ ॥

नैव तस्य कृतेनार्थो नाकृतेनेह कश्चन ।

न चास्य सर्वभूतेषु कश्चिदर्थव्यपाश्रयः ॥ १८ ॥

तृप्ती झालिया जैसीं। साधने सरती आपैसीं।

देखें आत्मतुष्टीं तैसीं। कर्मे नाही ॥ १४८ ॥

तस्मादसक्तः सततं कार्यं कर्म समाचर।

असक्तो ह्याचरन् कर्म पमाप्नोति पुरूषः ॥ १९ ॥

म्हणऊनि तूं नियतु। सकळ कामरहितु।

होऊनियां उचितु। स्वधर्मे रहाटें ॥ १५० ॥

जे स्वकर्मे निष्कामता। अनुसरले पार्था।

कैवल्य पर तत्वतां। पातले जगी ॥ १५१ ॥

कर्मणैव हि संसिद्धीमास्थिता जनकादयः।

लोकसंग्रहमेवापि संपश्यन् कर्तुमर्हसि ॥ २० ॥

देखें पां जनकादिक। कर्मजात अशेख।

न सांडिता मोक्षसुख। पावते जाहले ॥ १५२ ॥

याकारणे पार्था। होआवी कर्मी आस्था।

हे आणिकाही एका अर्था। उपकारेल ॥ १५३ ॥

जे आचरता आपणपेयां। देखी लागेल लोका यया।

तरी चुकेल हा अपाया। प्रसंगेचि। १५४ ॥

देखें प्राप्तार्थ जाहले। जे निष्कामता पावले।

तयाही कर्तव्य असे उरलें। लोकांलागीं ॥ १५५ ॥

मार्गी अंधासरिसा। पुढे देखणाही चाले जैसा।

अज्ञाना प्रकटावा धर्मु तैसा। आचरोनि ॥ १५६ ॥

हां गा ऐसें जरी न कीजे। तरी अज्ञानां काय वोजे।

तिहीं कवणेपरी जाणिजे । मार्गातें या ॥ १५७ ॥

यद् यदाचरति श्रेष्ठस्तत्तदेवेतरो जनः ।

स यत् प्रमाणं कुरुते लोकस्तदनुवर्तते ॥ २१ ॥

एथ वडील जें जें करिती । तया नाम धर्मु ठेविती ।

तेंचि येर अनुष्ठिती । सामान्य सकळ ॥ १५८ ॥

हें ऐसें असे स्वभावें । म्हणोनि कर्म न संडावे ।

विशेषें आचरावें । लागे संतीं ॥ १५९ ॥

न मे पार्थास्ति कर्तव्यं त्रिषु लोकेषु किंचन ।

नानवाप्तमवाप्तव्यं वर्त एव च कर्मणि ॥ २२ ॥

आता आणिकाचिया गोठी । तुज सांगो काय किरीटी ।

देखें मीचि इये राहाटी । वर्तत असे ॥ १६० ॥

काय सांकडे कांही मातें । कीं कवणें एकें आर्तें ।

आचरें मी धर्मातें । म्हणसी जरी ॥ १६१ ॥

तरी पुरतेपणालागीं । आणिकु दुसरा नाहीं जगीं ।

ऐसी सामुग्री माझां अंगी । जाणसी तूं ॥ १६२ ॥

मृत गुरूपुत्र आणिला । तो तुवां पवाडा देखिला ।

तोही मी उगला । कर्मी वर्ते ॥ १६३ ॥

यदि ह्यहं न वर्तेयं जातु कर्मण्यतन्द्रितः ।

मम वर्त्मानुवर्तंते मनुष्याः पार्थ सर्वशः ॥ २३ ॥

परी स्वधर्मी वर्ते कैसा । साकांक्षु कां होय जैसा ।

तयाचि एका उद्देशा - । लागोनियां ॥ १६४ ॥

जे भूतजात सकळ । असे आम्हांचि आधीन केवळ ।

ते न व्हावें बरळ । म्हणोनियां ॥ १६५ ॥

उत्सीदेयुरिमे लोका न कुर्यां कर्म चेदहम् ।

संकरस्य च कर्ता स्यामुपहन्यामिमाः प्रजाः ॥ २४ ॥

आम्ही पूर्णकाम होऊनी । जरी आत्मस्थिती राहुनी ॥

तरी हे प्रजा कैसेनि । निस्तरेल ॥ १६६ ॥

इहीं आमुची वास पाहावी । मग वर्तती परी जाणावी ।

ते लौकिक स्थिती अवघी । नासिली होईल ॥ १६७ ॥

म्हणोनि समर्थु जो एथें । आथिला सर्वज्ञते ।

तेणे सविशेषें कर्मातें । त्यजावे ना ॥ १६८ ॥

सक्ताः कर्मण्यविद्वांसो यथा कुर्वंति भारत ।

कुर्याद्विवांस्तथाऽसक्तश्चिकीर्षुर्लोकलोग्रहम् ॥ २५ ॥

देखे फळाचिया आशा । आचरे कामुकु जैसा ।

कर्मी बहरु होआवा तैसा । निराशाही ॥ १६९ ॥

जे पुढतपुढती पार्था । हे सकळ लोकसंस्था ।

रक्षणीय सर्वथा । म्हणऊनियां ॥ १७० ॥

मार्गाधारे वर्तावें । विश्व हें मोहरें लावावें ।

अलौकिक नोहावें । लोकांप्रति ॥ १७१ ॥

न बुद्धिभेदं जनयेदज्ञानां कर्मसंगिनाम् ।

जोषयेत् सर्वकर्माणि विद्वान् युक्तः समाचरन् ॥ २६ ॥

जें सायासें स्तन्य सेवी । तें पक्वान्नें केवीं जेवी ।

म्हणोनि बाळका जैशीं नेदावीं । धनुर्धरा ॥ १७२ ॥

तैशी कर्मी जया अयोग्यता । तयाप्रति नैष्कर्म्यता ।

न प्रगटावी खेळतां । आदिकरूनी ॥ १७३ ॥

तेथें सत्क्रियाचि लावावी । तेचि एकी प्रशंसावी ।

नैष्कर्मी हीद्रावावी । आचरोनि ॥ १७४ ॥

तया लोकसंग्रहालागीं । वर्ततां कर्मसंगी ।

तो कर्मबंधु आंगी । वाजेलना ॥ १७५ ॥

जैसी बहुरूपियाची रावो राणी । स्त्रीपुरुषभावो नाही मनीं ।

परी लोकसंपादणी । तैशीच करिती ॥ १७६ ॥

प्रकृते क्रियमाणानि गुणैः कर्माणि सर्वशः ।

अहंकारविमूढात्मा कर्ताहं इति मन्यते ॥ २७ ॥

देखें पुढिलाचें वोझें । जरी आपुला माथां घेईजे ।

तरी सांगे कां न दाटिजे । धनुर्धरा ॥ १७७ ॥

तैसी शुभाशुभें कर्में । जिये निफजति प्रकृतिधर्में ।

तियें मूर्ख मतिभ्रमें । मी कर्ता म्हणे ॥ १७८ ॥

ऐसा अहंकाराधिरूढ । एकदेशी मूढ ।

तया हा परमार्थ गूढ । प्रगटावा ना ॥ १७९ ॥

हें असो प्रस्तुत । सांगिजेल तुज हित ।

तें अर्जुना देऊनि चित्त । अवधारी पां ॥ १८० ॥

तत्ववित् तु महाबाहो गुणकर्मविभागयोः ।

गुणाः गुणेषु वर्तन्त इति मत्वा न सज्जते ॥ २८ ॥

जे तत्वज्ञियांचां ठायीं । तो प्रकृतिभावो नाहीं ।

जेथ कर्मजात पाहीं । निपजत असे ॥ १८१ ॥

ते देहाभिमानु सांडुनी । गुणकर्में वोलांडुनी ।

साक्षिभूत होऊनी । वर्तती देहीं ॥ १८२ ॥

म्हणूनि शरीरी जरी होती । तरी कर्मबंधा नाकळती ।

जैसा कां भूतचेष्टा गभस्ती । घेपवेना ॥ १८३ ॥

प्रकृतेर्गुणसंमूढाः सज्जन्ते गुणकर्मसु ।

तानकृत्स्नविदो मन्दान् कृत्स्नविन् न विचालयेत् ॥ २९ ॥

एथ कर्मी तोच लिंपे । जो गुणसंभ्रमें घेपे ।

प्रकृतिचेनि आटोपें । वर्ततु असे ॥ १८४ ॥

इंद्रियें गुणाधारें । राहाटती निजव्यापारें ।

तें परकर्म बलात्कारें । आपादी जो ॥ १८५ ॥

मयि सर्वाणि कर्माणि संन्यस्याध्यात्मचेतसा ।

निराशीर्निर्ममो भूत्वा युध्यस्व विगत्ज्वरः ॥ ३० ॥

परी उचिते कर्में आघवीं । तुवा आचरोनि मज अर्पावीं ।

परी चित्तवृत्तीन्यासावी । आत्मरूपीं ॥ १८६ ॥

हें कर्म मी कर्ता । कां आचरेन या अर्था ।

ऐसा अभिमानु झणें चित्ता । रिगो देसी ॥ १८७ ॥

तुवां शरीरपरा नोहावें । कामनाजात सांडावें ।

मग अवसरोचित भोगावे । भोग सकळ ॥ १८८ ॥

आतां कोदंड घेऊनि हातीं । आरूढ पां इये रथीं ।

देई आलिंगन वीरवृत्ती। समाधानें ॥ १८९ ॥

जगीं कीर्ती रूढवीं स्वधर्माचा मानु वाढवीं ।

मग भारापासोनि सोडवी । मेदिनी हे ॥ १९० ॥

आतां पार्था निःशंकु होई । या संग्रामा चित्त देई ।

एथ हें वांचूनि कांही। बोलों नये॥ १९१ ॥

ये मे मतमिदं नित्यमनुतिष्ठन्ति मानवः।

श्रद्धावन्तोऽनसूयन्तो मुच्यन्ते तेऽपि कर्मभिः॥ ३१ ॥

हें अनुपरोध मत माझें। जिहीं परमादरें स्वीकारिजे।

श्रद्धापूर्वक अनुष्ठिजे। धनुर्धरा॥ १९२ ॥

तेही सकळ कर्मी वर्ततु। जाण पां कर्मरहितु।

म्हणोनि हें निश्चितु। करणीय गा॥ १९३ ॥

ये त्वेतत्दभ्यसूयंतो नानुतिष्ठन्ति मे मतम्।

सर्वज्ञानविमूढांस्तान् विद्धि नष्टानचेतसः॥ ३२ ॥

नातरी प्रकृतिमंतु होऊनी। इंद्रियां लळा देऊनी।

जे हें माझे मत अव्हेरुनी। ओसंडिती॥ १९४ ॥

जे सामान्यत्वें लेखिती। अवज्ञा करूनि देखिती।

कां हा अर्थवादु म्हणती। वाचाळपणें॥ १९५ ॥

ते मोहमदिरा भ्रमले। विषयविखें घारले।

अज्ञानपंकी बुडाले। निभ्रांत मानीं॥ १९६ ॥

देखें शवाचां हातीं दिधलें। जैसे कां रत्न वायां गेलें।

नातरी जात्यंधा पाहलें। प्रमाण नोहे॥ १९७ ॥

कां चंद्राचा उदयो जैसा। उपयोगा नवचे वायसा।

मूर्खा विवेकु हा तैसा। रुचेल ना॥ १९८ ॥

तैसे ते पार्था। जे विमुख या परमार्था।

तयांसी संभाषण सर्वथा। करावे ना॥ १९९ ॥

म्हणोनि ते न मानिती। आणि निंदाही करूं लागती।

सांगे पतंग काय साहती । प्रकाशातें ॥ २०० ॥

पतंगा दीपीं आलिंगन । तेथ त्यासी अचूक मरण ।

तेवीं विषयाचरण । आत्मघाता ॥ २०१ ॥

सदृश्यं चेष्टते स्वस्याः प्रकृतेर्ज्ञानवानपि ।

प्रकृतिं यान्ति भूतानि निग्रहः किं करिष्यति ॥ ३३ ॥

म्हणोनि इंद्रिये एकें । जाणतेनि पुरुखें ।

लाळावीं ना कौतुकें । आदिकरूनि ॥ २०२ ॥

हां गा सर्पेंसी खेळों येईल । कीं व्याघ्रसंसर्ग सिद्धी जाईल ।

सांगे हाळाहाळ जिरेल । सेविलिया ॥ २०३ ॥

देखें खेळतां अग्नि लागला । मग तो न सांवरे जैसा उधवला ।

तैसा इंद्रिया लळा दिधला । भला नोहे ॥ २०४ ॥

एऱ्हवीं तरी अर्जुना। या शरीरा पराधीना ।

कां नाना भोगरचना । मेळवावी ॥ २०५ ॥

आपण सायासेंकरूनि बहुतें । सकळहि समृद्धिजातें।

उदोअस्तु या देहातें । प्रतिपाळावे कां ॥ २०६ ॥

सर्वस्वें शिणोनि एथें । अर्जवावीं संपत्तिजातें ।

तेणें स्वधर्मु सांडुनी देहातें । पोखावें काई ॥ २०७ ॥

मग हें तंव पांचमेळावा । शेखीं अनुसरेल पंचत्वा ।

ते वेळीं केला कें गिंवसावा । शीणु आपुला ॥ २०८ ॥

म्हणूनि केवळ देहभरण । ते जाणें उघडी नागवण ।

यालागी एथ अंतःकरण । देयावें ना ॥ २०९ ॥

इंद्रियस्येंद्रियस्यार्थे रागद्वेषौ व्यवस्थितौ ।

तयोर्न वशमागच्छेत् तौ ह्यस्य परिपंथिनौ || ३४ ||

एऱ्हवीं इंद्रियाचियां अर्था - | सारिखा विषयो पोखितां |

संतोषु कीर चित्ता | आपजेल || २१० ||

परी तो संवचोराचा संगु | जैसा नावेक स्वस्थु |

जंव नगराचा प्रांतु | सांडिजेना || २११ ||

बापा विषाची मधुरता | झणे आवडी उपजे चित्ता |

परी तो परिणाम विचारितां | प्राणु हरी || २१२ ||

देखें इंद्रियीं कामु असे | तो लावी सुखदुराशे |

जैसा गळीं मीनु आमिषें | भुलविजे गा || २१३ ||

परी तयामाजि गळु आहे | जो प्राणातें घेऊनि जाये |

तो जैसा ठाउवा नोहे | झांकलेपणें || २१४ ||

तैसें अभिलाषें येणें कीजेल | जरी विषयाची आशा कीजेल |

तरी वरपडा होईजेल | क्रोधानळा || २१५ ||

जैसा कवळोनियां पारधी | घातेचिये संधी |

आणि मृगातें बुद्धीं | साधावया || २१६ ||

एथ तैसीची परी आहे | म्हणूनि संगु हा तुज नोहे |

पार्था दोन्ही कामक्रोध हे | घातुक जाणें || २१७ ||

म्हणऊनि हा आश्रयोचि न करावा | मनींही आठवो न धरावा |

एकु निजवृत्तीचा वोलावा | नासों नेदीं || २१८ ||

श्रेयान् स्वधर्मो विगुणः परधर्मात् स्वनुष्ठितात् |

स्वधर्मे निधनम् श्रेयः परधर्मो भयावहः || ३५ ||

अगा स्वधर्मु हा आपुला | जरि कां कठिणु जाहला |

तरी हाचि अनुष्ठिला । भला देखें ॥ २१९ ॥

येरू आचारु जो परावा । तो देखतां कीर बरवा ।

परि आचरतेनि आचरावा । आपुलाचि ॥ २२० ॥

सांगे शूद्रघरीं आघवीं । पक्वान्ने आहाति बरवीं ।

तीं द्विजें केवीं सेवावीं । दुर्बळु जरी जाहला ॥ २२१ ॥

हें अनुचित कैसेनि कीजे । अप्राप्य केवीं इच्छिजे ।

अथवा इच्छिलेंही पाविजे । विचारीं पां ॥ २२२ ॥

तरी लोकांचीं धवळारें । देखोनियां मनोहरें ।

असतीं आपुलीं तणारें । मोडावीं केवीं ॥ २२३ ॥

हें असो वनिता आपुली । कुरुप जरी जाहली ।

तरी भोगितां तेचि भली । जियापरी ॥ २२४ ॥

तेवीं आवडे सांकडु । आचरता जरी दुवाडु ।

तरी स्वधर्मचि सुरवाडु । पारत्रिकीचा ॥ २२५ ॥

हां गा साकर आणि दूध । हें गौल्य कीर प्रसिद्ध ।

परी कृमीदोषीं विरुद्ध । घेपें केवीं ॥ २२६ ॥

ऐसेनिही जरी सेविजेल । तरी ते आळुकीची उरेल ।

जे तें परिणामीं पथ्य नव्हेल । धनुर्धरा ॥ २२७ ॥

म्हणोनि आणिकांसी जे विहीत । आणि आपणपेयां अनुचित ।

तें नाचरावे जरी हित । विचारिजे ॥ २२८ ॥

या स्वधर्मातें अनुष्ठितां । वेचु होईल जीविता ।

तोहि निका वर उभयतां । दिसतसे ॥ २२९ ॥

ऐसें समस्तसुरशिरोमणी । बोलिले जेथ श्रीशार्ङ्गपाणी ।

तेथ अर्जुन म्हणे विनवणी । असे देवा ॥ २३० ॥

हें जें तुम्हीं सांगितलें । तें सकळ कीर म्यां परिसलें ।

परि पुसेन कांही आपुले । अपेक्षित ॥ २३१ ॥

अर्जुन उवाच: अथ केन प्रयुक्तोऽयं पापं चरति पूरुषः ।

अनिच्छन्नपि वार्ष्णेय बलादिव नियोजितः ॥ ३६ ॥

तरी देवा हें ऐसें कैसें । जे ज्ञानियांचीही स्थितीही भ्रंशे ।

मार्ग सांडुनि अनारिसे । चालत देखों ॥ २३२ ॥

सर्वज्ञुही जे होती । हे उपायही जाणती ।

तेही परधर्मे व्यभिचरति । कवणें गुणें ॥ २३३ ॥

बीजा आणि भुसा । अंधु निवाडु नेणे जैसा ।

नावेक देखणाही तैसा । बरळे कां पां ॥ २३४ ॥

जे असता संगु सांडिती । तेचि संसर्गु करिता न धाती ।

वनवासीही सेविती । जनपदातें ॥ २३५ ॥

आपण तरी लपती । सर्वस्वें पाप चुकविती ।

परी बलात्कारे सुइजती । तयाचिमाजी ॥ २३६ ॥

जयांची जीवें घेती विवसी । तेचि जडोनि ठाके जीवेंसीं ।

चुकविती ते गिंवसी । तयातेंचि ॥ २३७ ॥

ऐस बलात्कारु एकु दिसे । तो कवणाचा एथ आग्रहो असे ।

हें बोलावे हृषिकेशें । पार्थु म्हणे ॥ २३८ ॥

श्रीभगवानुवाच: काम एष क्रोध एष रजोगुणसमुद्भवः।

महाशनो महापाप्मा विद्ध्येनमिह वैरिणम् ॥ ३७ ॥

तंव हृदयकमळारामु । जो योगियांचा निष्कामकामु ।

तो म्हणतसे पुरुषोत्तमु । सांगेन आइक ॥ २३९ ॥

तरी हे कम क्रोधु पाहीं । जयांते कृपेची साठवण नाहीं ।

हें कृतांताचां ठायीं । मानिजती ॥ २४० ॥

हे ज्ञाननिधीचे भुजंग । विषयदरांचे वाघ ।

भजनमार्गीचे मांग । मारक जे ॥ २४१ ॥

हे देहदुर्गीचे धोंड । इंद्रियग्रामीचे कोंड ।

यांचे व्यामोहादिक बंड । जगामाजि ॥ २४२ ॥

हे रजोगुण मानसाचे । समूळ आसुरियेचे ।

धायपण ययांचे । अविद्या केले ॥ २४३ ॥

हे रजाचे कीर जाहले । परी तमासी पढियंते भले ।

तेणें निजपद यां दिधले । प्रमादमोह ॥ २४४ ॥

हे मृत्यूचां नगरीं । मानिजति निकियापरी ।

जे जीविताचे वैरी । म्हणऊनियां ॥ २४५ ॥

जयांसि भुकेलियां आमिषा । हें विश्व न पुरेचि घांसा ।

कुळवाडी यांची आशा । चाळित असे ॥ २४६ ॥

कौतुकें कवळितां मुठीं । जिये चौदा भुवनें थेंकुटीं ।

तें भ्रांति तिये धाकुटी । वाल्हीदुल्ही ॥ २४७ ॥

जे लोकत्रयाचें भातुके । खेळताचि खाय कवतिकें ।

तिच्या दासीपणाचेनि बिकें । तृष्णा जिये ॥ २४८ ॥

हें असो मोहे मानिजे । यांते अहंकार घेपे दीजे ।

जेणे जग आपुलेनि भोजें । नाचवित असे ॥ २४९ ॥

जेणें सत्याचा भोकसा काढिला । मग अकृत्य तृणकुटा भरिला ।

तो दंभु रूढविला । जगीं इहीं ॥ २५० ॥

साध्वी शांती नागवली । मग माया मांगी शृंगारिली।

तियेकरवी विटाळविली । साधुवृंदे॥ २५१ ॥

इहीं विवेकाची त्राय फेडिली । वैराग्याची खाली काढिली ।

जितया मान मोडिली । उपशमाची ॥ २५२ ॥

इहीं संतोषवन खांडिले । धैर्यदुर्ग पाडिले ।

आनंदरोप सांडिले । उपडूनियां ॥ २५३ ॥

इहीं बोधाची रोपे लुंचिली । सुखाची लिपी पुसली ।

जिव्हारीं आगी सूदली। तापत्रयाची ॥ २५४ ॥

हे आंगा तव घडले । जीवींचि आथी जडले ।

परी नातुडती गिंवसले । ब्रह्मादिकां ॥ २५५ ॥

हें चैतन्याचे शेजारी । वसती ज्ञानाचां एका हारीं ।

म्हणोनि प्रवर्तले महामारी । सांवरती ना ॥ २५६ ॥

हें जळेंवीण बुडविती । आगीविण जाळिती ।

न बोलता कवळिती । प्राणियांते ॥ २५७ ॥

हे शस्त्रेंविण साधिती । दोरेंविण बांधिती ।

ज्ञानियासी तरी वधिती । पैज घेऊनि ॥ २५८ ॥

चिखलेंवीण रोविती । पाशिकेंवीण गोंविती ।

हे कवणाजोगे न होती । आंतौटेपणें ॥ २५९ ॥

धूमेनाऽव्रियते वन्हिर्यथादर्शो मलेन च ।

येथोल्बेनावृत्तो गर्भस्तथा तेनेदमावृतम्॥ ३८ ॥

जैसी चंदनाची मुळी । गिंवसोनी घेपे व्याळीं ।

ना तरी उल्बाची खोळी । गर्भस्थासी ॥ २६० ॥

कां प्रभावीण भानु । धूमेंवीण हुताशनु ।

जैसा दर्पण मळहीनु । कहींच नसे ॥ २६१ ॥

तैसें इहीविण एकलें । आम्हीं ज्ञान नाही देखिलें ।

जैसें कोंडेनि पां गुंतलें । बीज निपजे ॥ २६२ ॥

आवृतं ज्ञानमेतेन ज्ञानिनो नित्यवैरिणा ।

कामरूपेण कौन्तेय दुष्पूरेणतलेनच ॥ ३९ ॥

तैसें ज्ञान तरी शुद्ध । परी इहीं असे प्ररुद्ध ।

म्हणोनि तें अगाध । होऊनि ठेलें ॥ २६३ ॥

आधी यांते जिणावें । मग तें ज्ञान पावावें ।

तंव पराभवो न संभवे । रागद्वेषां ॥ २६४ ॥

यांते साधावयालागी । जें बळ जाणिजे अंगी ।

तें इंधन जैसें आगी । सावावो होय ॥ २६५ ॥

इंद्रियाणि मनो बुद्धिरस्याधिष्ठानमुच्यते ।

एतैरविमोहयत्येष ज्ञानमावृत्य देहिनम् ॥ ४० ॥

तैसे उपाय कीजती जे जे । ते यांसीचि होती विरजे ।

म्हणोनि हटियांते जिणिजे । इहींचि जगीं ॥ २६६ ॥

ऐसियांही सांकडां बोला । एक उपायो आहे आहे भला ।

तो करितां जरी आंगवला । तरी सांगेन तुज ॥ २६७ ॥

तस्मात् त्वमिंद्रियाण्यादौ नियम्य भरतर्षभ ।

पाप्मानं प्रहि ह्येनं ज्ञान्विज्ञाननाशनम् ॥ ४१ ॥

यांचा पहिला कुरुठा इंद्रियें । एथूनि प्रवृत्तिकर्मातें वियें ।

आधी निर्दळूनि घालीं तियें। सर्वथैव॥ २६८ ॥

इंद्रियाणि पराण्याहुरिंद्रियेभ्यः परं मनः।

मनसस्तु परा बुद्धियोर् बुद्धेः परतस्तु सः ॥ ४२ ॥

मग मनाची धांव पारुषेल। आणि बुद्धीची सोडवण होईल।

इतुकेनि थारा मोडेल। या पापियांचा॥ २६९ ॥

एवं बुद्धे परं बुद्ध्वा संस्तभ्यात्मानमात्मना।

जहि शत्रुं महाबाहो कामरूपं दुरासदम्॥ ४३ ॥

हें अंतरीहूनि जरी फिटले। तरी निभ्रांत जाण निवटले।

जैसें रश्मीवीण उरले। मृगजळ नाही॥ २७० ॥

तैसे रागद्वेष जरी निमाले। तरी ब्रह्मीचें स्वराज्य आलें।

मग तो भोगी सुख आपुलें। आपणचि॥ २७१ ॥

जे गुरुशिष्यांची गोठी। पदपिंडाची गांठी।

तेथ स्थिर राहोनि नुठीं। कवणे काळीं॥ २७२ ॥

ऐसें सकळ सिद्धांचा रावो। देवी लक्ष्मीयेचा नाहो।

राया ऐक देवदेवो। बोलता जाहला॥ २७३ ॥

आतां पुनरपि तो अनंतु। आद्य एकी मातु।

सांगेल तेथ पंडुसुतु। प्रश्नु करील॥ २७४ ॥

तया बोलाचा हन पाडु। का रसवृत्तीचा निवाडु।

येणें श्रोतयां होईल सुरवाडु। श्रवणसुखाचा॥ २७५ ॥

ज्ञानदेवो म्हणे निवृत्तिचा। चांग उठावा करूनि उन्मेषाचा।

मग संवादु श्रीहरिपार्थाचा। भोग बापा॥ २७६ ॥

अध्याय तिसरा समाप्त ||